# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५**

## ग्रामविकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - १६**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एल-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५३, जिल्हा प्रशासन**<br>**रूपये:- १,०६,५१,२१,४२,०००/-**<br>**श्री. अजय चौधरी** |
| (१) | १४१ | १०० | पुणे जिल्हयातील खेड तालुक्यातील मौजे जऊळके खुर्द ते वाफगांव रोड (ठाकरवाडी मार्गे) गट क्रमांक ६८१ मधून साधारणपणे ३ कि.मी. जात असून सदर मार्ग झाल्यास शेतकरी व ग्रामस्थांना अत्यंत सोईस्कर होणार असल्याने तेथील ग्रामस्थांनी तसेच ग्रामपंचायतीने ठराव करणे, परंतु अद्यापही सदरचा मार्ग होत नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | १४२ | १०० | पुणे जिल्हयातील खेड तालुक्यातील मौजे जऊळके या गावातील खारदरा वस्ती डांबरीकरणे करण्याकरिता तेथील सरपंचानी वारंवार संबधिताकडे मागणी करुनही कोणतीच कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. दिलीप सोपल** |
| (३) | २२१ | १० | राज्यातील ग्रामपंचायतीच्या सरपंच व उपसरपंच यांच्या मानधनात वाढ करण्याचा माहे सपटेंबर, २०२४ रोजी शासनाने घेतलेला निर्णय तथापि सरपंच व उपसरपंच यांना अद्याप वाढीव मानधन न मिळणे, याबाबत शासनाने कारवयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वजनिक बांधकामे**<br>**रूपये:- १,०६,००,००,०००/-**<br>**श्री. रोहित पाटील** |
| (४) | ६१२ | १०० | राज्यात विशेषतः ग्रामीण भागातील गावांमध्ये जलजीवन मिशन मधून पाणी योजना सौर प्रणालीवर करण्यात आल्या नसल्याने पाणीपुरवठा वीज बिल भरताना ग्रामपंचायतींना येणारी अडचण या गावासाठी विशेष बाब म्हणून स्वतंत्रपणे नवीन योजना कार्यक्रम बनवून सौर आधारित पाणी योजनेसाठी आर्थिक तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (५) | ४३२ | १० | मौ. शिरगाव येथील ब्राम्हणवाडी, ता. चिपळूण, जि.रत्नागिरी या वाडयामध्ये ग्रामस्थ राहत असून वाडीला लागून मौठा नाला असणे, नाल्यामुळे पावसाळयात मोठया प्रमाणावर पाणी गावात साचत असणे, पाणी साचल्यामुळे स्थानिक नागरीकांना त्रास सहन करावा लागत असणे, नाल्याचे पाणी घरामध्ये शिरत असणे, त्यामुळे घरांचे मोठया प्रमाणावर नुकसान होत असणे, नाल्याला प्रतिबंध करण्यासाठी प्रतिबंधक संरक्षण भिंत बांधण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, संरक्षण भिंत बांधून देण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. ग्रामविकास राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक ७/१/२०२५ रोजी मागणी केली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. वरुण सरदेसाई** |
| (६) | ६१८ | १०० | सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मौजे वायंगणी ता. कणकवली, ग्रामपंचायत इमारत बांधकाम करण्यास मान्यता देण्यात आलेली असणे, शासनाकडे आवश्यक निधी ची तरतूद केलेली नसणे, सदर कारणास्तव इमारतीचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत असणे, यामुळे स्थानिक ग्रामस्थांची दैनंदिन कामकाजामध्ये होणारी गैरसोय यामुळे नागरिकांची शासनाप्रति असंतोषाची भावना लक्षात घेता शासनस्तरावर सदर ग्रामपंचायत इमारत बांधकामा करीत आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. दिलीप सोपल** |
| (७) | १९६ | १० | तारळ गावात, ( ता. राजापूर, जि. रत्नागिरी ) माहे मार्च नतंर पाणी टंचाई होत असणे, याकरिता तारळ नळपाणी पुरवठा योजनेच्या विहीरीजवळ कायमस्वरुपी सिमेंट अथवा केटी बंधरा बांधल्यास पाण्याची साठवण होईल व पाण्याचा प्रश्न सुटेल याकरिता उक्त ठिकाणी सिमेंट अथवा केटी बंधरा बांधण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५०१, ग्रामविकासासाठी विशेष कार्यक्रम**<br>**रूपये:- १९,३६,४०,०४,०००/-**<br>**श्रीमती ज्योती गायकवाड** |
| (८) | २०२ | १०० | मौजे तळवली तर्फे उमटे,पो. सुडकोली, ता.अलिबाग जि. रायगड तळवली या गावात शिवमंदिर व श्री हनुमान मंदिर ही दोन मंदिरे असून याठिकाणी मोठया संख्येने भाविक दर्शनाकरिता व उत्सवाकरिता येत असतात. महाशिवरात्र उत्सव आणि श्री हनुमान जन्मोत्सव या उत्सवाकरिता आलेल्या भाविकांना शौचालय उपलब्ध नसल्याने गैरसोय होत असणे, गावामध्ये सार्वजनिक शौचालय नसल्यामुळे येथील महिला वर्गाला अत्यंत गैरसोय हणे, त्याकरिता या गावात दहा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सीटचे दोन सार्वजनिक शौचालय बांधण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (९) | ६२७ | १० | राज्य शासनाच्या माध्यमातून सुरु असलेल्या पूर्वीच्या संग्राम व सध्याचे आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पात मागील ११ वर्षापासू ग्रामीण भागात ग्रामपंचायत स्तरावर संगणक परिचालक ७ कोटी ग्रामीण जनतेला विविध प्रकारच्या सेवा देत असणे, या कर्मचाऱ्यांना केवळ ७००० हजार रुपये हे महागाईच्या काळात तुटपूंजे मानधन मिळत असणे, त्यांना कर्मचारी दर्जा व किमानवेतन मिळणे आवश्यक असून शासनाने स्थापन केलेल्या चावल समितीनेही २०२८ मध्ये या सर्व संगणक परिचालकांना ग्रामपंचायतच्या सुधारित आकृतीबंधात पदनिर्मिती करण्याची शिफारस करणे, त्यानुसार सदरील कर्मचारी त्यांना दरमहा ३० हजार मानधन व कर्मचारी दर्जा व्हावा, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५१५, इतर ग्रामिण विकास कार्यक्रम**<br>**रूपये:- ६७,९१,३२,५५,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (१०) | ६२५ | १०० | वडगाव शेरी, मौजे वडगाव शिंदे हे गाव पुणे शहरालगत असून या गावातील नागरीकरण झपाट्याने वाढत असणे, वाढत्या नागरिकांना बरोबर या गावात सध्या अस्तित्वात असलेली स्मशानभूमी जागे अभावी नागरिकांना अंत्यविधी करण्यासाठी अडचण येणे, स्मशानभूमी नसल्यामुळे नागरिक मतदानावर बहिष्कार टाकण्याच्या पावित्र्यात असणे, मौजे वडगाव शिंदे येथे स्मशानभूमीकरिता जागा उपलब्ध होण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रोहित पाटील** |
| (११) | ६११ | १०० | शासनाने ग्रामीण भागात नवीन ग्रामपंचायती इमारत बांधण्यासाठी सुरू केलेली स्वर्गीय बाळासाहेव ठाकरे स्मृती भवन योजना या योजनेतून बांधण्यात येणाऱ्या ग्रामपंचायत इमारतीसाठी भरीव आर्थिक तरतूद न केल्यामुळे इमारतीचे काम अनेक ठिकाणी निधी अभावी पडून काम अडून रहाणे लोकसंख्येच्या प्रमाणात लहान, मध्यम व मोठ्या गावातील ग्रामपंचायती बांधणेनाठी निधी कमी पडू नये याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: आय-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५१५, इतर ग्रामिण विकास कार्यक्रम**<br>**रूपये:- ६७,९१,३२,५५,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१२) | ६०६ | १० | पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील गुहीर या गावातील केतन जाधव यांच्या घरापासून ते दशरथ गायकर यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करण्याचे प्रस्तावित करण्यात येणे, येथील शेतकऱ्यांच्या दृष्ट्रीने सदर रस्ता तयार होणे अत्यंत आवश्यक असणे, सदर प्रस्तावित रस्ता हा पारंपारिक पायवाट असल्यामुळे शेतकऱ्यांना पावसाळ्यात नागर, बैल व शेतीचे साधने यांची ने आन करणे जिकरीचे असणे, तसेच शाळेतील विध्यार्थी यांना पावसाळ्यात पायवाटेने चिखलतून जावे लागणे, त्यामुळे या पायवाटेचे रस्तात रूपांतर करावे अशी मागणी ग्रामस्थांनी करणे, हा रस्ता होण्यासाठी जागा मालकाची संमती असणे तरी सुध्या या रस्त्यास मंजुरी मिळत नसल्याने नागरिकांत पसरलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी सदर गावातील ग्रामस्थ्यांची मागणी लक्षात घेता सदर रस्त्याच्या कामास निधीसह प्रशासकीय मंजूरी मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५१५, इतर ग्रामिण विकास कार्यक्रम**<br>**रूपये:- ६७,९१,३२,५५,०००/-**<br>**श्री. दिलीप सोपल** |
| (१३) | १९४ | १० | तारळचौके ग्रामपंचायत, (ता. राजापूर, जि. रत्नागिरी) अंतर्गत हरचली वाडी गवळदेव मंदिर महारण देव येथे नवरात्र,त्रिपुरारी पौर्णीमा इतर धार्मिक उत्सव होत असणे, तथापी तिथे जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे भाविकांची होत असलेली गैरसोय उक्त ठिकाणी १.५ कि.मी. रस्ता करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एल-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**रूपये:- ९,८०,५९,५२,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (१४) | ६०३ | १० | उमरेड, तालुका, कुही तालुका तसेच भिवापूर तालुक्यातील अनेक ग्रामीण भागातील रस्ते, व त्यावरील असणाऱ्या पुलांची अवस्था अत्यंत वाईट असून त्या ठिकाणी वारंवार अपघात होऊन नागरिक व वाहन धारकांना अडचणीचा सामना करावा लागतो त्यामुळे शासनाने उमरेड ग्रामीण रस्ते, व पूल नव्याने उभारण्यात येण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१५) | ४३१ | १० | मौजे धामापूर (खालचावाडा)-बौध्दवाडी-भाटीवाडी (तालुका-मालवण, जिल्हा-सिंधुदूर्ग) या ग्रामीण मार्ग क्रमांक-४०२ रस्त्याच्या मजबूतीकरणासह-डांबरीकरणासाठी शासनाने माहे डिसेंबर, २०२१ अखेर रुपये ४३०.३५ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देणे, सदर रस्त्याच्या सा.क्र.०/०० ते १/५०० मधील रस्ता दुरुस्तीचे काम जि.प.च्या विविध योजनांतर्गत प्राधान्याने प्रस्तावित करुन पूर्ण करण्याबाबत जिल्हापरिषद, सिंधुदूर्ग (सा.बा. विभाग) यांना मा.सा.बा.मंत्री यानी सूचना देणे, परंतु जि.प.सिंधुदूर्गन रस्त्याच्या सा.क्र. ०/०० ते १/५०० मधील रस्ता दुरुस्तीचे डांबरीकरणाचे काम निधी अनुपब्धतेमुळे अद्यापपर्यंत हाती न घेतल्याने रेती वाहून नेणाऱ्या डंपरच्या वाहतूकीने संपूर्ण रस्त्यात खड्ड पडून वाहतूकीस खराब होणे, संतापाची लाट, मौजे धामापूर (खालचावाडा)-बौध्दवाडी-भाटीवाडी या रस्त्याच्या सा.क्र.०/०० ते १/५०० मधील रस्त्याचे डांबरीकरण करुन देण्यासाठी, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१६) | ४३३ | १० | मालवण (ता.मालवण,जि.सिंधुदूर्ग) ते आचरा हा गावचा रस्ता अत्यंत खराब झाला असणे, रस्त्यावर खड्डे पडले असणे, रस्ता वाहतुकीस अयोग्य असणे, रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करुन मिळण्यासंदर्भात स्थानिक रहिवाशांनी व कांबळीवाडी उत्कर्ष मंडळ, मुंबई यांनी ग्रामविकास विभागाकडे वारंवार मागणी करणे, गावचा रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १९ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) ग्रामविकास विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई